Rayat Shikshan Sanstha's

**Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur**

**Department of Sociology**

# Visit to Tribal Community

**Date : 13/12/2017**



## शाहू कॉलेजतर्फे भैरीबांबरला भेट

कोल्हापूर, ता. २९ : राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमधील समाजशास्त्र विभागातर्फे भैरीबांबर (ता. राधानगरी) येथील आदिवासी (कातकरी) समाजाची भेट घेतली. विभागप्रमुख प्रा. बी. आर. नदाफ, सहप्राध्यापक सौ. एम. के. कन्नाडे यांनी अभ्यास सहलीचे आयोजन केले. केतन कांबळे, स्वालिया मुजावर, सारिका बुरुड, अभिषेक गायकवाड आदींनी आदिवासी कुटुंबातील समस्या जाणून घेतल्या. दरम्यान, विद्यार्थ्यांनी निर्मलग्राम पुरस्कार विजेत्या कांबळवाडीला भेट दिली. सरपंच, उपसरपंच यांनी गावच्या विकासाची माहिती दिली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE
KOLHAPUR

Rayat Shikshan Sanstha's

**Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur**

**Department of Sociology**

## Visit to Rajputwadi Aashram School




### शाहू कॉलेजची आश्रमशाळेस भेट

कोल्हापूर, ता. ११ : राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे रजपूतवाडी येथील प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा तसेच चंबुखडी येथील मातोश्री वृद्धाश्रमास भेट दिली. प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळेचे कार्यवाह प्रा. सुनील भोसले यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. बाबासाहेब नदाफ यांनी शाळेस आर्थिक मदत दिली. वृद्धाश्रमातील वृद्धांशी संवाद साधला. यानंतर गोकुळ शिरगाव येथील मायक्रोटेक कंपनीला भेट दिली. अजित आजरी यांनी स्वयंचलित यंत्राची प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. प्रा. श्रीमती एम. के. कन्नाडे यांनी नियोजन केले. प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी मार्गदर्शन केले.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE
KOLHAPUR

रयत शिक्षण संस्थेचे

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

समाजशास्त्र विभाग

# आदिवासी समाजास शाहू कॉलेजची भेट

**दिनांक-१३/१२/२०१७**

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने राधानगरी तालुक्यातील भैरी बामर परिसरात दीर्घ काळ वास्तव्य असणाऱ्या आदिवासी समाजाची भेट घेण्यात आली. यावेळी विभागप्रमुख प्रा. बी. आर. नदाफ व सहप्राध्यापिका एम.के. कन्नाडे यांनी या अभ्यास सहलीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी आदिवासी कुटुंबाच्या समस्या जाणून घेतल्या. भटके जीवन, बालविवाह, व्यसनाधीनता या समस्यांसह पाणी, आरोग्य, शिक्षण या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची खंत स्थानिक महिला वासंती निकम यांनी व्यक्त केली. तसेच नियमित रोजगार उपलब्ध नसल्याने उपासमारीची वेळ येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच यांनी गावच्या विकासाची रूपरेषा सांगितली. या गावात सौरउर्जा, पाणी कचरा व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, तंटामुक्त गाव, स्वच्छ परिसर अशी वैशिष्ट्ये दिसून आली. तसेच भटका व विमुक्त समाज विकास मंडळ कोल्हापूर संचलित प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा व महात्मा ज्योतिराव फुले कनिष्ठ महाविद्यालय रजपुतवाडी सोनतळी जिल्हा कोल्हापूर या ठिकाणी भेट देण्यात आली. भटक्या विमुक्त जमातीतील मुलांना शिक्षणाच्या बाबतीत आणि एकंदर जीवन जगताना येणाऱ्या अडचणी जाणून घेण्यात आल्या.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

Head
Department of Sociology
Rajarshi Chh. Shahu College, Kolhapur.